भा.प्र.से. परिवीक्षाधीन अधिकारी-२०२५
या तुकडी अंतर्गत ०८ अधिसंख्य सहायक
जिल्हधिकारी पदे निर्माण करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- पदनि-२०२६/प्र.क्र.६६/आस्था-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ एप्रिल,२०२६.

संदर्भ:- १) शासन निर्णय,वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०/०२/२०१६.
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.टीआरएन-१०२६/प्र.क्र.१०९/२०२६/भाप्रसे१ (दहा) दि.१८/०३/२०२६. चे पत्र

**शासन निर्णय :-**

सन २०२५ च्या तुकडीतील परिविक्षाधीन भारतीय प्रशासन सेवेमधील ०८ अधिका-यांचे लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसुरी येथील फेज-१ चे प्रशिक्षण दिनांक १७/०४/२०२६ (म. नं.) रोजी संपुष्टात येत आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे अधिकारी त्यांच्या पुढील जिल्हा प्रशिक्षणाकरिता राज्य शासनाकडे रुजू होत आहेत. सदरहू ०८ भारतीय प्रशासन सेवेमधील अधिकाऱ्यांच्या पुढील जिल्हा प्रशिक्षणासाठी सहायक जिल्हाधिकारी म्हणून त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या जिल्ह्यात पदस्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने सदर ०८ भारतीय प्रशासन सेवेमधील अधिकाऱ्यांसाठी खाली नमुद केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयांच्या आस्थापनेवर सहायक जिल्हाधिकारी संवर्गात पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दोन वर्षांच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पद निर्माण करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | परिवीक्षाधीन भा.प्र.से. अधिकाऱ्यांचे नाव | जिल्हा प्रशिक्षणासाठी प्रस्तावित जिल्हा | परिवीक्षाधीन कालावधी |
|---|---|---|---|
| १. | श्री.अजय काशिराम डोके | गडचिरोली | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| २. | श्री.अमल पी.वी. | पालघर | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ३. | श्रीमती अप्सरा एन. | पुणे | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ४. | श्री.दिव्यांक गुप्ता | बीड | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ५. | श्री.जयकुमार शंकर आडे | नाशिक | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ६. | श्री.पंकज मनोहर पटले | नंदूरबार | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ७. | श्री.आर.रंगमंजु | जालना | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |
| ८. | श्रीमती शोभिता पाठक | वर्धा | दि.२५.०८.२०२५ ते दि.२४.०८.२०२७ |

२.	शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार उपरोक्त अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी यांना महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

३.	सदरहू अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी यांच्या पदावर होणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)(०९३) जिल्हा आस्थापना (०१)(०२) आयुक्त नाशिक (२०५३ ००४६),(०१)(०३) आयुक्त, पुणे (२०५३ ००६४), (०१)(०४) आयुक्त अमरावती (२०५३ ००८२), (०१)(०५) आयुक्त नागपूर (२०५३ ०१०८), (०१) (०६) आयुक्त छत्रपती संभाजीनगर (२०५३ ०१२६) बाब क्र.०१ वेतन " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय हा वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२३१४५३५२१३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.04.23 14:55:23 +05'30'

**(अजित देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी ,गडचिरोली/पालघर/पुणे/बीड/नाशिक/नंदूरबार/जालना/वर्धा
३. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली/पालघर/पुणे/बीड/नाशिक/नंदूरबार/जालना/वर्धा
४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा),महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
५. उप सचिव, कार्यासन १०, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
६. उप सचिव, वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२.
७. उप सचिव/सह सचिव (कार्यासन अर्थसंकल्प/आस्था-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
८. निवड नस्ती (कार्यासन आस्था-८), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.